दैनिक
# आरंभ मराठी
www.arambhmarathi.com

■ कोल्हापूर ■ सांगली ■ सातारा ■ सोलापूर ■ धाराशिव ■ लातूर ■ वर्ष 3 रे ■ अंक 64 ■ गुरुवार 28 एप्रिल 2026 ■ पाने 04 ■ किंमत रू.4 ■ epaper.arambhmarathi.com


**सुविचार**

इतरांच्या सेवेत स्वतःला समर्पित करा.
तुमचा 'स्व' तुम्हाला सापडेल.


SS MOBILE®
धाराशिव जिल्ह्यात सर्वाधिक मोबाईल विक्री होणारे, विश्वसनीय ठिकाण.
(नवनवीन ऑफर जाणून घेण्यासाठी आजच संपर्क करा)
जिजाऊ चौक, बार्शी नाका, धाराशिव.
Mo.7841810075/8329723615


# जिल्ह्यातील १०० हून अधिक शाळा अजूनही नादुरुस्त; विद्यार्थ्यांना यंदाही जीव मुठीत धरून शिकावे लागणार

## पावसाळ्यापूर्वी शाळा दुरुस्तीचा प्रश्न ऐरणीवर; प्रशासन दुर्घटनेची वाट पाहत आहे का ?



सज्जन यादव । आरंभ मराठी

**धाराशिव : जिल्ह्यातील प्राथमिक शिक्षण व्यवस्थेची चिंताजनक स्थिती पुन्हा एकदा समोर आली आहे. मागील वर्षी झालेल्या अतिवृष्टीमुळे जिल्ह्यातील १३९ शाळांच्या सुमारे ४०० वर्गखोल्यांची पडझड झाली होती. ऑगस्ट, सप्टेंबर आणि ऑक्टोबर महिन्यात झालेल्या मुसळधार पावसामुळे अनेक शाळा मोठ्या प्रमाणावर बाधित झाल्या होत्या. परिणामी काही गावांतील शाळा मंदिरांमध्ये, तर काही ठिकाणी सार्वजनिक सभागृह, ग्रामपंचायत इमारती आणि इतर पर्यायी जागांमध्ये सुरू करण्यात आल्या होत्या. मात्र, आता नवीन शैक्षणिक वर्ष सुरू होण्यास अवघे पंधरा दिवस शिल्लक असतानाही शंभरहून अधिक शाळांची अवस्था अद्यापही अत्यंत बिकट असल्याचे वास्तव समोर आले आहे. विद्यार्थ्यांना यंदाही जीव मोठी धरून त्याच नादुरुस्त शाळांमध्ये शिक्षण घ्यावे लागणार आहे.**

धाराशिव जिल्ह्यात जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये सव्वा लाखांहून अधिक विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. शिक्षणाची मंदिरे मानल्या जाणाऱ्या या शाळांची अवस्था आधीच दयनीय होती. त्यात मागील वर्षीच्या अतिवृष्टीने रस्ते, पूल, सार्वजनिक इमारतींसह जिल्हा परिषद शाळांचेही मोठे नुकसान केले. पावसामुळे आठ तालुक्यांतील तब्बल १३१ शाळांच्या ३९७ वर्गखोल्या बाधित झाल्या होत्या. यामध्ये भूम, परंडा आणि कळंब तालुक्यांतील शाळांचे सर्वाधिक नुकसान झाले होते. जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागाने नोव्हेंबर महिन्यात नुकसानग्रस्त शाळांची माहिती संकलित करून प्रशासनाकडे दुरुस्तीसाठी निधीची मागणी केली होती. त्यानुसार ३९७ वर्गखोल्यांच्या दुरुस्तीसाठी सुमारे ३ कोटी ५४ लाख रुपयांचा अंदाजित निधी प्रस्तावित करण्यात आला होता. मात्र त्यानंतर शाळांची संख्या वाढल्याने आवश्यक निधीची गरजही वाढली. सध्या अनेक प्राथमिक शाळांच्या इमारती अत्यंत धोकादायक अवस्थेत असल्याचे स्पष्ट झाले आहे. अनेक वर्गखोल्यांचे छत गळत आहे, भिंतींना मोठे तडे गेले आहेत, तर काही इमारती पडझडीच्या उंबरठ्यावर उभ्या आहेत. अशा परिस्थितीत विद्यार्थ्यांना त्या वर्गखोल्यांमध्ये बसवणे धोकादायक ठरत असून, काही ठिकाणी शाळांना समाजमंदिरे, ग्रामपंचायत कार्यालये, भाडेतत्त्वावरील खोल्या आणि इतर पर्यायी जागांचा आधार घ्यावा लागत आहे. विशेष म्हणजे काही शाळा अधिकृत धोकादायक यादीत नसल्या तरी त्यांच्या इमारतींची अवस्था अत्यंत



### केवळ ५८ शाळांच्या दुरुस्तीला मंजुरी

शिक्षण विभागाने बांधकाम विभागाकडे ५८ शाळांच्या दुरुस्तीचा प्रस्ताव पाठवला होता. त्यानुसार ५८ शाळांच्या दुरुस्तीसाठी तांत्रिक मान्यता देण्यात आली आहे. वर्क ऑर्डर प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर प्रत्यक्ष कामाला गती मिळणार आहे. सुमारे २ कोटी ८१ लाख रुपये खर्चून २०८ वर्गखोल्यांची दुरुस्ती करण्यात येणार आहे. मात्र यातील केवळ २० ते ३० टक्के कामे पूर्ण झाली असून, तब्बल ७० टक्के कामे अद्याप अपूर्ण आहेत. उर्वरित ८१ शाळांच्या दुरुस्तीसाठी जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागाने शिक्षण संचालकांकडे निधीची मागणी केली आहे. दरम्यान, शाळा दुरुस्तीची कामे अत्यंत संथ गतीने सुरू असल्याने पालकांमध्येही चिंता वाढली आहे.



### शाळा दुरुस्तीचा प्रश्न मार्गी लागला नाही

सिरसाव गावामध्ये गेल्या वर्षी सप्टेंबर महिन्यात आलेल्या अतिवृष्टीमुळे इयत्ता पहिली ते चौथीच्या चारही वर्गात पाणी गेले होते. इमारत अत्यंत जीर्ण झाली आहे. इमारतीला जिल्हाधिकारी पुजार, तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. मैनक घोष, माजी खासदार छत्रपती संभाजीराजे, खासदार ओमराजे निंबाळकर, आमदार तानाजी सावंत, तत्कालीन विरोधी पक्षनेते अंबादास दानवे या वरिष्ठ मंडळींनी भेट देऊन सुद्धा शाळेचा इमारतीचा प्रश्न मार्गी लागला नाही. संदर्भात प्रशासनाकडे पाठपुरावा सुरू आहे.

**समाधान देवराम, सिरसाव.**
**शालेय व्यवस्थापन समिती उपाध्यक्ष**

### मुलांना उघड्यावर किती दिवस शिकवणार ?

आता दुसरा पावसाळा येतोय तरीही इमारतीची दुरुस्ती न झाल्यामुळे आमच्या मुलांना कधी मंदिरात तर कधी झाडाखाली शिक्षण घ्यावं लागत आहे. ग्रामपंचायत व जिल्हा प्रशासन या शाळेच्या इमारतीची नोंद कधी घेणार ? त्वरित नवीन शाळा बांधून द्यावी अशी मागणी आमची आहे. विद्यार्थ्याला बसायला चांगले असेल तरच मन लावून अभ्यास करू शकतील.

**निलेश चोबे**
**पालक, सिरसाव**

### पावसाळ्यात धोका वाढण्याची शक्यता

काही शाळांच्या इमारती अधिकृतपणे धोकादायक घोषित नसल्या तरी त्यांची प्रत्यक्ष स्थिती गंभीर आहे. गळके छत, ओलसर भिंती, निकृष्ट बांधकाम साहित्य आणि दुर्लक्षित देखभाल यामुळे दुर्घटनेचा धोका अधिक वाढला आहे. पावसाळा सुरू झाल्यानंतर परिस्थिती आणखी गंभीर होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. अशा परिस्थितीत विद्यार्थी आणि शिक्षक दोघांच्याही सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला आहे. शिक्षण हा विद्यार्थ्यांचा मूलभूत अधिकार असताना सुरक्षित शैक्षणिक वातावरण उपलब्ध करून देणे ही प्रशासनाची जबाबदारी आहे. मात्र, अद्यापही अनेक शाळा दुरुस्तीच्या प्रतीक्षेत असल्याने प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. केवळ कागदी घोडे नाचवण्यापेक्षा प्रत्यक्षात धोकादायक शाळांचे बांधकाम आणि दुरुस्ती तातडीने पूर्ण करणे आवश्यक आहे.

### अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या शाळांची संख्या

| तालुका | शाळांची संख्या | वर्गखोल्या |
|---|---|---|
| धाराशिव | १४ | ४७ |
| तुळजापूर | १४ | ३८ |
| उमरगा | ०५ | ३० |
| लोहारा | १५ | ५५ |
| कळंब | २८ | ६२ |
| वाशी | ०९ | २० |
| भूम | ०९ | २८ |
| परंडा | ३७ | ११७ |
| एकूण | १३१ | ३९७ |

## अवैध दारूच्या विरोधात पोलिसांची धडक कारवाई; १८ गुन्हे दाखल

**धाराशिव :-** जिल्ह्यात अवैध मद्यनिर्मिती व विक्रीला आळा घालण्यासाठी पोलिस प्रशासनाने मंगळवारी ( दि.२६ ) व्यापक मोहीम राबवत विविध पोलीस ठाणे हद्दीत एकूण १८ ठिकाणी धाडसत्र कारवाया केल्या. पोलीस अधीक्षक रितु खोखर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आलेल्या या कारवाईत मोठ्या प्रमाणात गावठी दारू व मद्यनिर्मितीसाठी वापरला जाणारा रासायनिक साठा जप्त करण्यात आला.पोलिसांनी छाप्यांदरम्यान सुमारे १,१८० लिटर गावठी दारू निर्मितीसाठी वापरले जाणारे गुळमिश्रित रासायनिक द्रव, ३७० लिटर गावठी दारू, ५० लिटर सिंधी ताडी तसेच देशी-विदेशी दारूच्या १७० सिलबंद बाटल्या जप्त केल्या. जप्त करण्यात आलेल्या मुद्देमालाची एकूण किंमत अंदाजे १ लाख ६८ हजार ४०० रुपये असल्याचे सांगण्यात आले.

## सोन्याच्या आमिषाने 4 लाखांची फसवणूक

**धाराशिव :-** सोन्याच्या पट्ट्या विकण्याचे आमिष दाखवून एका युवकाची ४ लाख रुपयांची फसवणूक झाल्याची घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी धाराशिव शहर पोलीस ठाण्यात दोन अनोळखी व्यक्तींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, फिर्यादी रोहीत हरीशचंद्र कदम (वय ३१, रा. बौध्दनगर, धाराशिव) यांच्याकडे दि. २० मे २०२६ रोजी सायंकाळी ४ वाजण्याच्या सुमारास वैराग येथील बिलाल कॉलनी परिसरात एक अनोळखी पुरुष व एक महिला आले. त्यांनी विश्वास संपादन करून सोन्याच्या पट्ट्या विकण्याचे आमिष दाखविले. त्यानंतर फिर्यादींकडून तब्बल ४ लाख रुपये घेऊन त्यांना काही पट्ट्या दिल्या. मात्र, संबंधित पट्ट्यांची तपासणी केली असता त्या सोन्याच्या नसून पितळ धातूच्या असल्याचे निष्पन्न झाले. आपली फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर रोहीत कदम यांनी धाराशिव शहर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. या फिर्यादीवरून धाराशिव शहर पोलीस ठाण्यात भा.न्या.सं. कलम ३१८(४), ३(५) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलीस करीत आहेत.

## अवैध मुरूम वाहतुकीवर कारवाई करण्यास गेलेल्या पथकाला धमकावून टीप्पर चालक फरार

आरंभ मराठी । धाराशिव

धाराशिव तालुक्यात सुरू असलेल्या अवैध गौण खनिज उत्खनन व वाहतुकीविरोधात महसूल प्रशासनाने कारवाईचा बडगा उगारला असून, कौडगाव परिसरातील अवैध मुरूम वाहतुकीप्रकरणी टिप्पर चालकासह चौघांविरुद्ध ग्रामीण पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. महसूल पथकाला दमदाटी करून टिप्परमधील मुरूम खाली करण्यास मदत केल्याचा आरोप संबंधितांवर करण्यात आला आहे. याबाबत नायब तहसीलदार विशाखा अविनाश बलकवडे यांनी सरकारतर्फे फिर्याद दिली आहे.

धाराशिव तालुक्यात मोठ्या प्रमाणावर सुरू असलेल्या अवैध गौण खनिज उत्खननावर कठोर कारवाई करण्याचे आदेश तहसीलदार तथा तालुका दंडाधिकारी डॉ मृणाल जाधव यांनी महसूल विभागाला दिले होते. त्यानुसार दिनांक २६ मे रोजी सायंकाळी कौडगाव परिसरात अवैध मुरूम उत्खनन सुरू असल्याची माहिती मिळाल्यानंतर नायब तहसीलदार बलकवडे यांनी महसूल पथकासह रात्री कारवाईसाठी कौडगाव येथे धाव घेतली. रात्री सुमारे ९.२० वाजण्याच्या सुमारास कौडगाव बसस्थानकाजवळ एमएच २५ एन ९९०९ क्रमांकाचा टिप्पर अडवून तपासणी करण्यात आली. चालकाने आपले नाव स्वप्नील धनाजी थोरात असे सांगितले. टिप्परमध्ये सुमारे चार ब्रास मुरूम आढळून आले. मात्र, त्या मुरूम वाहतुकीसंदर्भातील कोणताही अधिकृत परवाना चालकाकडे नसल्याचे निदर्शनास आले. महसूल पथकाने पुढील कारवाईसाठी टिप्पर तहसील कार्यालयात आणण्याचा निर्णय घेतला. त्यावेळी ग्राममहसूल अधिकारी विकास नागटिळक व मनोज क्षीरसागर हे टिप्परमध्ये उपस्थित होते. दरम्यान, कौडगाव येथील एका पेट्रोलपंपावर डिझेल भरण्यासाठी टिप्पर थांबविण्यात आला. त्याचवेळी दोन दुचाकींवरून चार जण तेथे आले. त्यातील एक जण बालाजी विरसिंह थोरात असल्याचे समोर आले. फिर्यादीनुसार, संबंधितांनी टिप्पर तहसील कार्यालयात नेऊ नये, अशी दमदाटी करत महसूल अधिकाऱ्यांशी अर्वाच्य भाषेत वाद घातला. तसेच टिप्परमधील मुरूम पेट्रोलपंप परिसरात खाली करण्यास मदत केली. त्यानंतर टिप्पर चालकाने वाहन वेगाने बार्शीच्या दिशेने नेले. गाडीत बसलेल्या महसूल कर्मचाऱ्यांना "खाली उतरा, अन्यथा गाडी खड्यात घालीन," अशी धमकी दिल्याने भीतीपोटी दोन्ही कर्मचारी खाली उतरले. या घटनेची माहिती मिळताच ग्रामीण पोलिसांनी घटनास्थळी भेट देत पुढील तपास सुरू केला आहे. संबंधितांविरुद्ध शासकीय कामात अडथळा निर्माण करणे, दमदाटी करणे तसेच अवैध गौण खनिज वाहतुकीस मदत केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दरम्यान, धाराशिव तालुक्यातील करजखेडा मंडळातील अवैध गौण खनिज तपासणी पथकानेही स्वतंत्र कारवाई केली. या कारवाईदरम्यान नायब तहसीलदार शिंदे, मंडळ अधिकारी श्रीमती सुकेशनी कांबळे तसेच मंडळातील ग्राममहसूल अधिकारी उपस्थित होते. जप्त वाहन बेंबळी पोलीस स्टेशन येथे जमा करण्यात आले असून, संबंधित वाहनाविरुद्ध पुढील दंडात्मक कारवाईसाठी तहसील कार्यालयामार्फत उपविभागीय अधिकारी धाराशिव यांच्याकडे प्रस्ताव पाठविण्यात येणार असल्याची माहिती प्रशासनाने दिली. अवैध गौण खनिज उत्खनन व वाहतुकीवर नियंत्रण आणण्यासाठी मंडळनिहाय विशेष तपासणी पथके सक्रिय करण्यात आल्याची माहिती तहसीलदार डॉ. मृणाल जाधव यांनी दिली.

दैनिक आरंभ मराठी

### ग्रामपंचायतींमध्ये विशेष ग्रामसभेचे आयोजन,राजकीय हालचालींना वेग

## जिल्ह्यातील 440 ग्रामपंचायतींमध्ये 12 जूनला होणार आरक्षण सोडत

आरंभ मराठी । धाराशिव

जिल्ह्यात प्रशासकराज असलेल्या ४२८ ग्रामपंचायतींसह इतर १२ अशा एकूण ४४० ग्रामपंचायतींमध्ये सार्वत्रिक निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर हालचालींना वेग आला आहे. या ग्रामपंचायतींसाठी १२ जून रोजी विशेष ग्रामसभांचे आयोजन करण्यात आले असून, तहसीलदार यांनी प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली आरक्षण सोडतीचा कार्यक्रम पार पडणार आहे.

यासंदर्भातील आदेश राज्य निवडणूक आयोगाने २६ मे रोजी जिल्हाधिकाऱ्यांना दिले आहेत. या सोडतीमध्ये अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, नागरिकांचा मागास प्रवर्ग तसेच महिला सदस्यांसाठी आरक्षण निश्चित करण्यात येणार आहे. ओबीसींसाठी राखीव जागांची संख्या ग्रामपंचायतींमधील एकूण भरावयाच्या जागांच्या २७ टक्क्यांपर्यंत मर्यादित राहणार असून, एकूण आरक्षण ५० टक्क्यांपेक्षा जास्त होणार नाही याची दक्षता घेतली जाणार आहे. राज्य निवडणूक आयोगाने दिलेल्या निर्देशानुसार, आरक्षित जागांचे वाटप ग्रामपंचायतीतील विविध प्रभागांना चक्रानुक्रमे (आळीपाळीने) करण्यात येणार आहे. त्यामुळे आगामी ग्रामपंचायत निवडणुकांच्या दृष्टीने जिल्ह्यातील राजकीय वातावरण चांगलेच तापणार आहे. यापूर्वी सरपंच पदाची आरक्षण सोडत काढण्यात आलेली आहे. त्यामुळे ग्रामीण निवडणुकीच्या दृष्टीने भागात राजकीय वातावरण तयार होण्यास सुरुवात झाली आहे.




### तालुका निहाय ग्रामपंचायतींची संख्या

धाराशिव - ६५
तुळजापूर - ५५
उमरगा - ५३
लोहारा - २८
कळंब - ६१
वाशी - ३६
भूम - ७२
परंडा - ७०
एकूण - ४४०

### सोडतीचा कार्यक्रम

**विशेष ग्रामसभेची सूचना देणे - ८ जून**
**विशेष ग्रामसभा बोलाविणे - १२ जून**
**आरक्षणाचे प्रारुप प्रसिद्ध - १९ जून**
**हरकती, सूचना - १९ ते २५ जून**
**एसडीओंचे अभिप्राय - ३ जुलै**
**जिल्हाधिकाऱ्यांची मान्यता - ८ जुलै**
**जिल्हधिकाऱ्यांद्वारे प्रसिद्धी - १० जुलै**

# भ्रष्टाचार: व्यवस्थेला लागलेली कीड..

शिवाजी विठ्ठल चौगुले
मु.पो. मासा बेलेवाडी, कागल-कोल्हापूर





महाराष्ट्रात पावसाने आपली झलक दाखवायला सुरुवात केली आहे. आता मे महिना संपत आला आहे. पहिला पाऊस पडला की शहरांच्या विकासाचे दावे वाहून जातात. मुंबईत 'हिंदमाता' तलाव होतो, पुण्यात 'डेक्कन' नदी बनते, नागपुरात रस्ते कालवे होतात.कोल्हापूर.. पूरमय होत हे दृश्य नवीन नाही. दरवर्षी जून ते सप्टेंबर याच बातम्या, तेच फोटो, तेच पाहणी दौरे सुरू राहतात. फरक फक्त एकच होतो, पाण्याची पातळी वाढते, पण जबाबदारीची पातळी घटत जाते. कारण शहरं बुडत असली तरी लोकप्रतिनिधींना याचे भान नसते. २००५ ची मुंबईची ढगफुटी आजही अंगावर काटा आणते. त्यावेळी ९४४ मिमी पाऊस झाला. १००० पेक्षा जास्त बळी गेले होते. शंभर वर्षांत अशी आपत्ती पुन्हा येणार नाही, असे म्हटले जात होते, पण आता दर दोन वर्षांनी मुंबई निम्मी बुडते. कारण आपत्ती नैसर्गिक कमी, मानवनिर्मित जास्त आहे. २६ जुलैच्या मुंबईबुडीच्या चौकशी समितीने २००६ साली १८४ शिफारशी दिल्या. मिठी नदीचं रुंदीकरण, पंपिंग स्टेशन, डोंगराळ भागात संरक्षक भिंती. २० वर्षात त्यातल्या निम्म्याही पूर्ण झाल्या नाहीत. अहवाल कपाटात आणि शहर पाण्यात अशी स्थिती होत असते. पुण्याची कथा वेगळी नाही. 'ऑक्सफर्ड ऑफ द ईस्ट' म्हणवणारं शहर पहिल्याच सरीत गुडघाभर पाण्यात असतं. सिंहगड रोड, बिबवेवाडी, कात्रज, वारजे सगळीकडे एकच बोंब असते. कारण मुळा-मुठा नदीच्या पूररेषेत बांधकामाला सर्रास परवानग्या दिल्या. 'रिव्हरफ्रंट डेव्हलपमेंट'च्या गोंडस नावाखाली नदीतच घुसखोरी करण्यात आली. नदीला जागा नसली की, ती मार्ग शोधते. मग ती लोकांच्या घरात शिरते. आयटी हब, स्मार्ट सिटी, मेट्रो सिटी ही सगळी विशेषणं पाण्यासमोर फिकी पडतात. समस्या फक्त जुन्या शहरांची नाही. नव्याने 'स्मार्ट' बनवलेल्या नाशिक, औरंगाबाद, सोलापूरमध्येही तीच कथा आहे. रस्त्याच्या दोन्ही बाजूला फुटपाथसाठी काँक्रीटीकरण केलं, पण पाणी मुरायला एक इंच जागा सोडली नाही. सगळीकडे सिमेंटची जंगले उभारण्यात आली. 'हरित क्षेत्र' फक्त डीपी प्लॅनमध्ये उरले. झाडं तोडली, तलाव बुजवले, टेकड्या फोडल्या. विकासाच्या नावाखाली निसर्गाचा गळा घोटला. आता निसर्ग उलटा श्वास घेतोय. त्यामुळे माणसाला धाप लागत आहे. दरवर्षी नालेसफाई हा सफाईपेक्षा मोठा घोटाळा म्हणून चर्चेत येतो. मुंबईत ५०० कोटी, पुण्यात १५० कोटी. बिलं निघतात, फोटो सेशन होतात, पण नाले तसेच तुंबलेले राहतात. कारण कंत्राटदार, अधिकारी, नगरसेवक यांची साखळी पक्की आहे. गाळ काढला तर ट्रकच्या ट्रिपा मोजायला पाहिजेत. पण कागदावर १०० ट्रिपा आणि प्रत्यक्षात १० असतात. उरलेला पैसा वाटून खाल्ला जातो. सीसीटीव्ही लावले तरी कॅमेरा बंद असतो. जिओ-टॅगिंगचे फोटो दुसऱ्याच ठिकाणचे असतात. तंत्रज्ञान आहे, पण प्रामाणिकपणा नाही. ब्रिटिशांनी बांधलेली ड्रेनेज सिस्टीम आजही निम्म्या मुंबईला तारते. कारण त्यांनी दूरदृष्टी ठेवली होती. आपण ७५ वर्षात एकही नवीन मास्टर स्टॉर्म वॉटर ड्रेन बनवू शकलो नाही. 'ब्रिमस्टोवॅड' प्रकल्प १९९३ पासून रेंगाळत आहे. ८ पंपिंग स्टेशन्सपैकी ६ अजून बांधून व्हायची आहेत. लोकसंख्या तिप्पट झाली, वाहने दहापट झाली, पण पायाभूत सुविधा तशाच. मग पाणी तुंबणार नाही तर काय होणार? या सगळ्यात भरडला जातो सामान्य माणूस. सकाळी ९ चे ऑफिस गाठायला घरून ६ वाजता निघावे लागते. लोकल बंद पडली की टॅक्सीवाले लूट करतात. हातावर पोट असणाऱ्याचा रोजगार बुडतो. छोट्या दुकानदाराचे सामान भिजून लाखोंचे नुकसान होते. रुग्णालयात जायला रस्ताच नसतो. गेल्यावर्षी मुंबईत साचलेल्या पाण्यात वीजप्रवाह उतरून ७ जणांचा मृत्यू झाला. त्याची जबाबदारी कुणी घेतली? कुणीच नाही. कारण नेत्यांच्या घरासमोर २४ तास पंप असतात. मंत्रालयात पाणी शिरत नाही. त्यामुळे त्यांना झळ पोहोचत नाही. उपाय कठीण नाहीत. सिंगापूर आपल्यासारखाच मान्सूनच्या प्रभावातील देश आहे. तिथे ६० टक्के पाऊस एका तासात पडतो, तरी रस्त्यावर पाणी साचत नाही. कारण त्यांनी 'एबीसी वॉटर प्रोग्राम' राबवला. याचा अर्थ ॲक्टिव्ह, ब्युटिफुल आणि क्लिन. प्रत्येक इमारतीवर रेनवॉटर हार्वेस्टिंग, रस्त्याच्या कडेला 'बायो-स्वेल्स', मोठे भूमिगत टँक. टोकियोत नदीखाली ५ स्टेडियमएवढी पाण्याची टाकी आहे. आपल्याकडे इच्छाशक्तीचा दुष्काळ आहे, पाण्याचा नाही. सर्वात आधी राजकीय इच्छाशक्ती हवी. नाल्यांवरची, नदीकाठची सगळी अनधिकृत बांधकामे पाडली पाहिजेत. 'गरीब माणूस राहतो' ही सहानुभूती इथे चालणार नाही, कारण त्याच अतिक्रमणामुळे हजारो गरीबांचे जीव धोक्यात येतात. नालेसफाईची खरे तर जबाबदारी थेट आयुक्तांची असते. पाणी तुंबलं तर महापालिका अधिकाऱ्यांची पगार कपात करून प्रमोशन थांबवायला हवे. प्रत्येक नव्या बांधकामाला 'झिरो नेट रनऑफ' बंधनकारक करा. म्हणजे इमारतीच्या आवारात पडणारा पाऊस त्याच आवारात जिरला पाहिजे. नागरिकांनीही भूमिका बदलली पाहिजे. प्लास्टिक नाल्यात टाकणं बंद करायला हवे. सोसायटीतले चेंबर नियमित साफ करायला हवे. तक्रार फक्त ट्विटरवर न करता, लेखी देऊन पाठपुरावा करायला हवा. निवडणुकीत रस्ता, पाणी, ड्रेनेज या मुद्द्यांवर मत द्या, जाती-धर्मावर नाही. कारण पाणी साचताना ते हिंदू-मुस्लीम बघत नाही. स्मार्ट सिटी म्हणजे ड्रोन शो नाही, स्मार्ट सिटी म्हणजे कोरडा आणि सुस्थितीतील रस्ता ही पहिली गरज. केवळ मेट्रो रेल सुरू करून चालणार नाही. कारण जमिनीवर उतरावेच लागते. कारण नाले तुंबले तर चालणार कसे. जोपर्यंत जागरूक नागरिक म्हणून लोक लोकप्रतिनिधींना जाब विचारत नाहीत, तोपर्यंत सुधारणा होणे अवघड आहे. त्यांच्या नुसत्या पाहणी दौऱ्यांनी पाणी तुंबणे बंद होणार नाही.

त्यासाठी कृती हवी. केवळ विदेशी अभ्यासदौरे करून भागणार नाही, त्यासाठी सरकारने प्रामाणिकपणे काम करायला हवे. पण भ्रष्टाचार ही आपल्याकडील व्यवस्थेला लागलेली भयंकर कीड आहे. त्यामुळे समस्या सोडवण्यापेक्षा ती वर्षानुवर्षे तशीच ठेवण्यावरच जास्त भर असतो.

## दुधनाळ येथे तीन लाख भाविक भक्तांच्या उपस्थितीत श्री शिव महापुराण कथेला सुरुवात

आरंभ मराठी । उमरगा



तालुक्यातील दुधनाळ येथील महादेव मंदिर परिसरात आयोजित केलेल्या श्री शिव महापुराण कथेची सुरुवात तीन लाख भाविक भक्तांच्या उपस्थितीत आंतरराष्ट्रीय कथावाचक पं. प्रदीप मिश्रा यांच्या वाणीतून शिव कथेची सुरुवात बुधवारी (दि. २७) झाली. महाराष्ट्र कर्नाटक राज्याच्या सीमेवरील लातूर जिल्ह्याचे शेवटचे टोक व धाराशिव जिल्ह्याचे शेवटचे टोक सीमावरती भागातील डोंगराळ परिसरात राजेंद्र पाटील कुटुंबाच्या वतीने शिहोर वाले आंतरराष्ट्रीय कथा वाचक पंडित मिश्रा यांच्या प्रमुख उपस्थितीत शिव महापुराण कथेचे वाचन सुरू झाले आहे. यावेळी लातूर भाजपाचे सौ. अर्चना पाटील चाकूरकर, आमदार प्रवीण स्वामी, धाराशिव जिल्हा परिषदेच्या उपाध्यक्षा सौ. उषाताई गायकवाड, अजिंक्य पाटील, भाजपा नेते प्रकाश आष्टे, उमरगा पंचायत समिती सदस्य दगडु पाटील, लातूर चे नेते बजरंग दादा जाधव, आयोजक राजेंद्र पाटील, विकास पाटील, प्रदिप पाटील, सागर पाटील, बसवराज अनंतराव पाटील, जिल्हा परिषद सदस्य अप्पासाहेब पाटील, नाना मदनसुरे आदी. प्रमुख मान्यवर उपस्थित होते. या कार्यक्रमाची सुरुवात आयोजक राजेंद्र पाटील व परिवाराने कलश व शिवकथा पुरानाचे पुजन करून केले. शेवटी आ. प्रवीण स्वामी, जिल्हा परिषदेच्या उपाध्यक्षा सौ. उषाताई गायकवाड व पाटील परिवाराने आरती करून पहिल्या दिवसाची सांगता केली. या वेळी तिन्ही पेंडाल भरून व बाहेर मोठ्या संख्येने भक्त उपस्थित होते. अंदाजे तीन लाखांपर्यंत महिला व पुरूष सहभागी झाले होते. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी दोन हजार महिला व पुरुष स्वयंसेवकांनी परिश्रम घेतले तर वाहतुक व शांतता सुरळीत ठेवण्यासाठी उमरगा पोलीस अधिकारी यांनी चोख बंदोबस्त ठेवला होता. या ठिकाणी सकाळी व संध्याकाळी मोफत भोजनाची व्यवस्था आयोजकांनी केली आहे.

# पर्यटन, सावधगिरी आणि जीवनाचा समतोल

किशोर जाधव,
सोलापूर
मो. नं. ९९२२८८२५४१





कोकण आणि पश्चिम महाराष्ट्राला जोडणाऱ्या पोलादपूर–महाबळेश्वर मार्गावरील आंबेनळी घाटात नुकतीच (२५ मे २०२६ रोजी) एक भीषण दुर्घटना घडली. सहलीवरून परतताना एक स्कॉर्पिओ गाडी तब्बल ८०० ते १००० फूट खोल दरीत कोसळली. या अपघातात सातारा जिल्ह्यातील आसगाव (कोरेगाव) येथील आठ तरुणांचा जागीच मृत्यू झाला. कोकणात पर्यटनासाठी अवघ्या महाराष्ट्रातून लोक जातात. कोकणाशी जोडणारे अंबा घाट, आंबेनळी घाट, भोर घाट, कुंभारली घाट हे सर्व घाट आणि त्यातून जाणारे रस्ते अत्यंत वळणावळणाचे व धोकादायक आहेत. या घाटांतून वाहन चालवणे म्हणजे वाहनचालकाच्या कौशल्याची खरी परीक्षा असते. अरुंद आणि वळणदार रस्त्यांवरून गाडी चालवताना अनुभवी चालकाचाही कस लागतो. एका बाजूला उंच डोंगर, तर दुसऱ्या बाजूला हजार ते दीड हजार फूट खोल दऱ्या — अशा परिस्थितीत वाहन चालवणे म्हणजे स्वतःचे कौशल्य पणाला लावणे होय. आजकाल चारचाकी वाहनांची संख्या झपाट्याने वाढली आहे. लोकांनी महागड्या चारचाकी गाड्या विकत घेतल्या आहेत. गाड्या घेऊन लोक आता मोठ्या प्रमाणात पर्यटनासाठी बाहेर पडत आहेत. विशेषतः तरुण मंडळी मित्रांसह कोकण, गोवा, कर्नाटक, केरळ अशा ठिकाणी फिरण्यासाठी जात आहेत. मात्र, या तरुणांचे वाहन चालवण्याचे कौशल्य अनेकदा पूर्णपणे परिपक्व झालेले नसते. ड्रायव्हिंगमधील पुरेसा अनुभवही नसतो. अशा वेळी पर्यटनाचा आनंद घेणे चुकीचे नसले, तरी पुरेशी सावधगिरी बाळगणे अत्यंत आवश्यक आहे. स्वतःचे वाहण चालवण्याचे कौशल्य उत्तम नसेल तर सोबत ज्याने अनेक वेळा कोकणा सारख्या घाटरस्त्यांवरून वाहन चालवलेले आहे असा अनुभवी वाहनचालक सोबत घेऊन जाणे गरजेचे ठरते. कारण आपला जीव निश्चितच अधिक मौल्यवान आहे. उन्हाळी सुट्टीत कोकणातील समुद्रकिनारे, छत्रपती शिवाजी महाराजांचे किल्ले, निसर्गसौंदर्य, तेथील विविध खाद्यपदार्थ आणि बाजारपेठा यांचे पर्यटन मनाला आनंद आणि समाधान देणारे असते. वर्षभराच्या कामाचा शिणवटा घालवण्यासाठी, हवाबदल म्हणून आणि दैनंदिन जीवनातील एकसुरीपणातून बाहेर पडण्यासाठी पर्यटन आवश्यकच आहे.पर्यटनामुळे नवीन भागातील लोकांचे जीवन, त्यांची बोलीभाषा, आहार, धार्मिक व सांस्कृतिक परंपरा यांची ओळख होते. निसर्ग, मानवी जीवन, चालीरीती, परंपरा, खेळ आणि सामाजिक धारणा यांतील विविधता समजून घेता येते. दर दहा किलोमीटरवर माणसांचे जीवन किती बदलते, याची जाणीव होते. पर्यटनातून डोळसपणा मिळतो, निरीक्षणशक्ती वाढते आणि माणसामाणसांतील स्नेहसंबंध अधिक दृढ होतात.

प्रवास आणि अपघात यांमध्ये खबरदारीला फार महत्त्व असते. शेवटी, माणसाचे जीवन म्हणजे समतोलपणा होय. जीवनात अनेक गोष्टी आपण धोक्याचा विचार न करता करत असतो. काही गोष्टी मिळवण्यासाठी धोका पत्करावा लागतो. अनेक गोष्टींवर विजय मिळवण्यासाठीही धैर्य दाखवावे लागते. असा विजय म्हणजेच पराक्रम होय. पर्यटन आणि त्यातून स्वतःचे जीवन समृद्ध करण्यासाठी केलेला प्रवास हाही एका अर्थाने पराक्रमच आहे. हे सारे खरे असले, तरी उत्तम वाहनचालक, प्रवासाला निघण्यापूर्वी वाहनाची पूर्वतपासणी, प्रवासादरम्यान मद्यपान टाळणे, यांसारख्या खबरदारीच्या गोष्टी पाळल्या, तर पर्यटनाचा आनंद सुरक्षितपणे घेता येतो. त्याचबरोबर वळणावळणाच्या घाटरस्त्यांच्या कडेला सुरक्षिततेचे मजबूत कठडे असणे आवश्यक आहे. जेवढा सुरक्षित आणि सावधगिरीने आपण प्रवास करू तेवढा आपल्याला पर्यटनाचा आनंद घेता येईल.

## बेकायदेशीर विकास आराखडा आणि बांधकाम प्रकरणी तुळजापूर नगरपरिषदेकडे तक्रार

आरंभ मराठी । तुळजापूर

शहरातील गट नं. 138/1 मधील कथित बेकायदेशीर विकासकाम, अनधिकृत बांधकामे आणि संशयास्पद खरेदी-विक्री व्यवहार प्रकरण पुन्हा एकदा चर्चेत आले आहे. या प्रकरणी माजी उपनगराध्यक्ष यांच्यासह 26 जणांविरोधात तातडीने फौजदारी गुन्हे दाखल करावेत, अशी मागणी नगरसेविका सौ.प्रगती गोपाळ लोंढे यांच्यावतिने नगरपरिषद मुख्याधिकाऱ्यांकडे करण्यात आली आहे.तक्रारदारांनी दिलेल्या निवेदनानुसार, तुळजापूर येथील गट नं. 138/1 मधील सुमारे 2 हेक्टर 63 आर जमिनीमध्ये बेकायदेशीर विकास आराखडा तयार करून त्याआधारे खरेदी-विक्री व्यवहार करण्यात आले. तसेच या ठिकाणी अनधिकृत बांधकामे, पत्र्याचे गाळे व इतर बांधकामे उभारण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे. या प्रकरणी यापूर्वीही जिल्हाधिकारी तथा जिल्हा दंडाधिकारी यांनी अप्पर जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली सात सदस्यीय समिती गठीत केली होती. तसेच उपविभागीय अधिकारी यांनी तहसीलदार तुळजापूर यांच्या नेतृत्वाखाली पाच सदस्यीय समितीची नियुक्ती केली होती. या दोन्ही समित्यांनी केलेल्या चौकशी अहवालात गंभीर अनियमितता समोर आल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. तसेच सर्व महिलांच्या वतीने दिलेल्या निवेदनाची दखल




24 जून 2026 पर्यंत नाही घेतल्यास नगर परिषदेचे मुख्य अधिकारी यांच्या दालनात 25 जून 2026 रोजी असंख्य महिलांच्या उपस्थितीत ठिय्या आंदोलन करण्याचा इशारा देण्यात आला आहे. या निवेदनावर सुकन्या कदम,ज्योती कदम,अविदा जगताप,कविता लोंढे,वैशाली लोंढे,दिपाली बर्वे,वनिता कदम,वंदना कदम,रेश्मा कदम,संगीता परदेशी,रेखा भिसे,जयश्री लोंढे,सुवर्णा पेंदे तसेच नगरसेवक अमोल कुतवळ,आनंद जगताप,रणजीत इंगळे,अक्षय परमेश्वर,अमोल जाधव,रमेश चिवचिवे,संजय लोंढे,संभाजी नेपते,किरण कदम,विक्रम कदम,मल्हार बर्वे,दयानंद लोंढे,मयूर कदम,किरण लोंढे,पृथ्वीराज कदम,बाळासाहेब कदम,विलास कदम तसेच जय अंबिका तरुण मंडळाचे संपूर्ण सदस्य व महिला वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## त्यागमूर्ती माता रमाई यांच्या स्मृतीस धाराशिव येथे अभिवादन

आरंभ मराठी । धाराशिव



धाराशिव येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळयाजवळ त्यागमुर्ती माता रमाई यांच्या स्मारकास बौध्द उपासिका जयश्री बनसोडे, रमाई फाऊंडेशनचे अध्यक्ष पृथ्वीराज चिलवंत, महात्मा फुले जयंती उत्सव समितीचे महादेव माळी यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले. या प्रसंगी बौध्द उपासक गुणवंत सोनवणे यांनी सामुहिक त्रिशरण, पंचशील घेतले. यावेळी माता रमाई अमर रहे, माता रमाईंचा विजय असो अशा घोषणा देण्यात आल्या. डॉ. बाबासाहेब आंबेडकराचे व्यक्तीमत्व घडविण्यात त्यागमुर्ती माता रमाई यांचा महत्वाचा वाटा राहिलेला आहे. रमाईच्या व्यक्तीमत्वात त्याग, समर्पण, सहनशिलता, अन्यायाविरुध्द बंड करण्याची शक्ती, स्वाभिमानाचे प्रतिक म्हणजे माता रमाई होय. अनंत अडचणींचा सामना करत माता रमाईने बाबासाहेबांना शेवटच्या क्षणापर्यंत साथ दिली. स्वतःच्या वेदना मनात ठेवून बाबासाहेबांच्या बरोबर त्या शेवटपर्यंत उभ्या राहिल्या. प्रचंड संयमी, साधी राहणी, परिश्रमशील वृत्ती, कुटुंबाविषयी व समाजाविषयी जिव्हाळयाची भावना त्यांच्यात होती. दारिद्रय, आरोग्याच्या सोयीचा अभाव यामुळे त्यांना स्वतःच्या अपत्यांना गमवावे लागले.

पण त्या खचून गेलेल्या नाहीत. शेवटपर्यंत संघर्ष करत व समाजाची काळजी करत राहिल्या. म्हणूनच त्यांना माता रमाई म्हणून समाज ओळखतो आहे. त्या सर्व समाजाच्या आई रमाई झाल्या आहेत. या कार्यक्रम प्रसंगी एम.डी. जानराव, सुनिल बनसोडे, नितीन लांडगे, जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता समिती सदस्य सुशांत सोनवणे, कुंदन चिलवंत, शौर्य लोखंडे, प्रदिप शिंदे, सचिन दिलपाक, एस.एम. बनसोडे, अशोक बनसोडे, बलभीम कांबळे, धनंजय वाघमारे, पी.के. बनसोडे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजभूषण पुरस्कार प्राप्त विजय गायकवाड, स्वराज जानराव, प्रा. महेंद्र चंदनशिवे, अतुल लष्करे, दिपक सरवदे इत्यादी बौध्द उपासक, उपासिकांची उपस्थिती होती.

हे पत्र मालक, मुद्रक, संपादक चंद्रसेन गोविंदराव देशमुख यांनी आदेश प्रिंटर्स, रामकृष्ण कॉलनी,गवळी वाडा धाराशिव, ता. जि. धाराशिव, येथे छापुन रामकृष्ण कॉलनी, गवळी वाडा, धाराशिव (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. (न्यायीक क्षेत्र धाराशिव)
संपादक श्री. चंद्रसेन गोविंदराव देशमुख. मो.नं. ९८२२५९३९८० RNI NO.-2023/90078 कार्यालय; सुकर्मा कॅपिटल, बार्शी नाका, जिजाऊ चौक, धाराशिव-४१३५०१.मो. ९४२२०६८४२२. This letter was published by owner, printer, editor Chandrasen Govindrao Deshmukh, printed at Aadesh Printers, Ramkrishna Colony, Gawli Wada Dharashiv, Ta. Dist. Dharashiv, and published at Ramkrishna Colony, Gawli Wada, Dharashiv (Maharashtra).
पुणे कार्यालयः1012,विंग B, पूर्वांचल,वेबग्योर स्कुलशेजारी, वाघोली,पुणे.

### १२०० रुपयांत बनावट शिक्के, ६०० रुपयांत ‘९० दिवस काम’ प्रमाणपत्र; कामगार योजनेत मोठा गैरप्रकार उघड

# बांधकाम मजुरांच्या कल्याणकारी योजनेत बोगस लाभार्थ्यांचा सुळसुळाट

## ग्रामीण भागात फसवणुकीचा धंदा तेजीत

अभिजित साळुंके | आरंभ मराठी

**लोहारा : महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाकडील नोंदीत पात्र बांधकाम कामगारांना बांधकामासाठी आवश्यक असलेली अवजारे खरेदी करण्याकरिता मंडळाकडून दर तीन वर्षांतून एकदा पाच हजार रुपयांपर्यंत अर्थसहाय्य देण्याची योजना सुरू करण्यात आली आहे. मात्र, या योजनेचा काही भामट्यांकडून गैरफायदा घेतला जात असल्याचे धक्कादायक चित्र समोर येत आहे. लोहारा तालुक्यासह ग्रामीण भागात चक्क बोगस लाभार्थी तयार करून शासनाची फसवणूक केली जात असल्याचे प्रकार उघडकीस येत आहेत.**

बांधकाम कामगारांना अवजारे खरेदी करण्यासाठी अर्थसहाय्य मिळावे या उद्देशाने उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाकडून गेल्या वर्षापासून ही योजना राबविण्यात येत आहे. या योजनेंतर्गत पात्र बांधकाम कामगारांना दर तीन वर्षांनी एकदा लाभ घेता येतो. तसेच पुढील तीन वर्षांनंतर लाभ मिळविण्यासाठी संबंधित बांधकाम कामगाराची मंडळाकडे सलग तीन वर्षे नोंदणी असणे बंधनकारक आहे. योजनेचा लाभ मिळविण्यासाठी पात्र बांधकाम कामगाराने मंडळाकडे विहित नमुन्यातील अर्ज सादर करणे आवश्यक असते. मात्र, या प्रक्रियेचा गैरफायदा घेत काही भामटे आणि एजंट ग्रामीण भागात सक्रिय झाले असून ते खोटे लेटरहेड, बनावट शिक्के आणि बोगस कागदपत्रांच्या आधारे कामगारांचे अर्ज भरून देत असल्याचे समोर आले आहे. एवढेच नव्हे तर अर्ज कार्यालयापर्यंत पोहोचविणे, मंजुरीसाठी पाठपुरावा करणे आणि योजना मंजूर करून देण्याच्या नावाखाली नागरिकांकडून मोठ्या प्रमाणावर पैसे उकळले जात असल्याचे चित्र आहे.

### ९० दिवस काम केल्याचे प्रमाणपत्र ६०० रुपयांत

योजनेसाठी मागील वर्षभरात ९० दिवस किंवा त्यापेक्षा अधिक दिवस बांधकाम क्षेत्रात काम केल्याचे प्रमाणपत्र आवश्यक असल्याने हेच प्रमाणपत्र बनवून देण्यासाठी काही लोकांकडून ६०० रुपये आकारले जात आहेत. बांधकाम क्षेत्राशी काहीही संबंध नसलेल्या व्यक्तींनाही हे प्रमाणपत्र सर्रास विकले जात असल्याचा आरोप होत आहे.



### शिक्षणासाठीही विविध योजनांचा लाभ

बांधकाम कामगारांच्या मुलांच्या शिक्षणासाठी मंडळाकडून विविध आर्थिक मदत दिली जाते. पहिली ते सातवीपर्यंत २ हजार ४०० रुपये, आठवी ते दहावीपर्यंत ५ हजार रुपये, दहावी-बारावीत ५० टक्क्यांपेक्षा अधिक गुण मिळाल्यास १० हजार रुपये, पदवीच्या शैक्षणिक साहित्यासाठी २० हजार रुपये, वैद्यकीय शिक्षणासाठी १ लाख रुपये, अभियांत्रिकी शिक्षणासाठी ६० हजार रुपये, पदवी शिक्षणासाठी २० हजार रुपये, पदव्युत्तर शिक्षणासाठी २५ हजार रुपये तसेच एमएस-सीआयटी उत्तीर्ण विद्यार्थ्यांना फी परतावा दिला जातो. या विविध योजनांमुळे अनेक इतर कामगारांनीही बोगस अर्ज करून लाभ मिळविण्याचा प्रयत्न केल्याच्या तक्रारी पुढे येत आहेत.

### नोंदणीसाठी आवश्यक कागदपत्रे

फॉर्म क्रमांक – V
वयाचा पुरावा
९० दिवस काम केल्याचे प्रमाणपत्र
रहिवासी पुरावा
ओळखपत्र पुरावा
पासपोर्ट आकाराचे तीन फोटो

### नोंदणीसाठी पात्रता

वय १८ ते ६० वर्षे, मागील १२ महिन्यांत किमान ९० दिवस बांधकाम कामगार म्हणून काम केलेले असणे आवश्यक

### अर्ज भरून देण्याचेही घेतले जात आहेत पैसे

वडाळागाव परिसरात सध्या बांधकाम कामगारांच्या अवजारे खरेदी योजनेची मोठ्या प्रमाणावर चर्चा सुरू आहे. अनेक ठिकाणी अर्ज भरून देण्यासाठी स्वतंत्र दुकाने थाटण्यात आली आहेत. योजना मंजूर झाल्यास पैसे व अवजारे मिळत असल्याने नागरिकांची गर्दी वाढली आहे. एका अर्जासाठी १०० ते १५० रुपये आकारले जात असल्याचे समोर आले आहे.

### बनावट पुरावे तयार करून देण्याचाही धंदा

नोंदणीसाठी लागणारे वयाचे पुरावे, रहिवासी पुरावे व इतर कागदपत्रे तयार करून देण्यासाठी काही एजंटांनी स्वतंत्र दुकाने सुरू केली आहेत. या कागदपत्रांसाठी ३०० ते ४०० रुपये शुल्क घेतले जात असल्याचे समोर आले आहे.

### योजनेसाठी पात्रतेचे निकष

१) लाभार्थी महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाकडे नोंदणीकृत असावा
२) लाभार्थ्यांची नोंदणी जीवित असावी
३) लाभार्थ्याचे बँक खाते असणे आवश्यक
४) अर्जामध्ये बँक खात्याचा तपशील देणे बंधनकारक
५) लाभार्थ्याकडे आधार कार्ड असणे आवश्यक
६) पुढील तीन वर्षांनंतर लाभ घेण्यासाठी सलग तीन वर्षे नोंदणी आवश्यक
७) एका कुटुंबातील अनेक व्यक्ती नोंदणीकृत असल्यास केवळ एकच लाभार्थी पात्र राहणार

### धाराशिव जिल्ह्यातील कामगारांची आकडेवारी

भूम – १७६९
कळंब – १००३
लोहारा – १४३८
उमरगा – ३६१
धाराशिव – २८४६
परंडा – २६९
तुळजापूर – ३८८५
वाशी – २८२५

### १२०० रुपयांत बोगस लेटरहेड आणि शिक्के

लोहारा व ग्रामीण भागात काही भामट्यांनी बोगस मजूर संस्था तयार करून तसेच काही बांधकाम व्यावसायिकांच्या नावाचे डुप्लिकेट लेटरहेड तयार करून १२०० रुपयांत बनावट शिक्के व कागदपत्रे उपलब्ध करून देण्याचा धंदाच सुरू केला आहे. विशेष म्हणजे झोपडपट्टी भागात काही एजंट फिरत असून “पाच हजारांचे साहित्य मिळवून देतो” असे सांगून नागरिकांकडून पैसे उकळले जात असल्याचे समोर आले आहे.

## तिर्रट मटका जुगारावर पोलिसांचा छापा; पाच लाखांचा मुद्देमाल जप्त

आरंभ मराठी । धाराशिव

जुगार विरोधी कारवाईदरम्यान धाराशिव शहर पोलिसांनी वडगाव (सि.) येथील बंद पडलेल्या कुक्कुटपालनावर छापा टाकून तिरट मटका जुगार अड्ड्यावर कारवाई केली. या कारवाईत पोलिसांनी रोख रक्कम, मोटारसायकली, मोबाईल फोन व जुगार साहित्य असा एकूण ४ लाख ९० हजार ९८० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. पोलीसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, मंगळवारी (दि.२६) दुपारी धाराशिव शहर पोलीस ठाण्याच्या पथकाने वडगाव (सि.) येथील बंद पडलेल्या कुक्कुटपालनात छापा टाकला. यावेळी आरोपी तुकाराम भागवत जाधव, मारुती भाऊ जाधव यांच्यासह अन्य ११ जण तिरट मटका जुगार खेळत असल्याचे आढळून आले. कारवाईदरम्यान पोलिसांनी जुगार साहित्य, चार मोटारसायकली, ११ मोबाईल फोन तसेच रोख रक्कम असा एकूण ४,९०,९८० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. याप्रकरणी धाराशिव शहर पोलीस ठाण्यात संबंधित आरोपींविरुद्ध महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक कायदा कलम १२ (अ) अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला असून पुढील तपास पोलीस करीत आहेत.

## परंड्यात गोवंशीय जनावरांना बांधून ठेवल्या प्रकरणी तिघांविरुद्ध गुन्हा दाखल

**परंडा :-** गोवंशीय जनावरांना चारा-पाण्याविना निर्दयपणे बांधून ठेवल्याप्रकरणी परंडा पोलिसांनी तिघांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. ही कारवाई सोमवारी (दि.२५) रात्री परंडा शहरातील कुरेशी गल्ली येथे करण्यात आली. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी इम्रान गणी कुरेशी, बब्बु कुरेशी आणि अमजद कुरेशी (सर्व रा. परंडा, ता. परंडा, जि. धाराशिव) यांनी गोवंशीय जातीच्या दोन जर्शी गायी व दोन गावरान गायी अशा एकूण ४० हजार रुपये किंमतीच्या जनावरांना चारा-पाण्याची कोणतीही व्यवस्था न करता निर्दयतेने कत्तलीसाठी बेकायदेशीररीत्या बांधून ठेवले होते.याबाबत माहिती मिळाल्यानंतर परंडा पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत कारवाई केली. याप्रकरणी सरकारतर्फे आरोपींविरुद्ध प्राण्यांना क्रूरतेने वागणूक देण्यास प्रतिबंध अधिनियम कलम ११(१), ११(१)(ए), ११(१)(एफ), ११(१)(एच), ११(१)(आय) तसेच महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम कलम २(अ), ५(बी), ९(ब), ११ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

## गांजा प्रकरणाची माहिती पोलिसांना दिल्याच्या संशयावरून २५ लाखांची खंडणी; चौघांविरुद्ध गुन्हा दाखल

आरंभ मराठी । भूम

गांजाच्या गुन्ह्याबाबत पोलिसांना माहिती दिल्याच्या संशयावरून एका व्यक्तीकडे २५ लाख रुपयांची खंडणी मागून मारहाण केल्याप्रकरणी भुम पोलीस ठाण्यात चौघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, फिर्यादी सुरेश शामराव पवार (वय ३६, रा. कल्याणनगर, भुम) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून आरोपी दत्ता बिरु काळे, रावजी दत्ता काळे, सुब्राव रमेश काळे व बप्पा सवंत काळे (सर्व रा. भुम, ता. भुम, जि. धाराशिव) यांच्याविरुद्ध गुन्हा नोंद करण्यात आला आहे. दि. १५ डिसेंबर ते दि. २९ एप्रिल २०२६ या कालावधीत, भुम पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या गांजाच्या गुन्ह्याबाबत माहिती पोलिसांना का दिली, असा जाब विचारत आरोपींनी फिर्यादीकडे २५ लाख रुपयांची मागणी केली. तसेच शिवीगाळ करत लाथाबुक्क्यांनी मारहाण करून धमकी दिल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. या प्रकरणी सुरेश पवार यांनी दिलेल्या प्रथम खबरेवरून भुम पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता कलम ३०८(३), ११५(२), ३५२, ३५१(३), ३२४(४), ३(५) सह ११५(अ)/११७ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलीस करत आहेत.

दैनिक आरंभ मराठी

### पूरग्रस्तांना आर्थिक मदतीचा हात

## परंडा केमिस्ट असोसिएशनचा मार्गदर्शन चर्चासत्र

आरंभ मराठी । परंडा

परंडा तालुका केमिस्ट अँड ड्रगिस्ट असोसिएशनच्या वतीने तालुकास्तरीय केमिस्ट व ड्रगिस्ट बांधवांसाठी मार्गदर्शन व चर्चासत्र कार्यक्रम मंगळवारी (दि. 26) येथील विश्रामगृहात उत्साहात पार पडला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी धाराशिव जिल्हा केमिस्ट अँड ड्रगिस्ट असोसिएशनचे जिल्हाध्यक्ष धनाजी आनंदे होते. ऑल इंडिया ऑर्गनायझेशन ऑफ केमिस्ट अँड ड्रगिस्ट तसेच महाराष्ट्र स्टेट केमिस्ट अँड ड्रगिस्ट असोसिएशनचे अध्यक्ष जगन्नाथ शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली तालुक्यातील अतिवृष्टी व पूरग्रस्त केमिस्ट बांधवांना आर्थिक मदत करण्यात आली. यावेळी भगवंत मेडिकल (सिरसाव) यांना 2 लाख, शिवराज मेडिकल (चिंचपूर खु.) यांना 85 हजार व एम. एस. मेडिकल (ढगपिंपरी) यांना 1 लाख 13 हजार रुपयांचे धनादेश प्रदान करण्यात आले. औषध व्यवसायात पारदर्शकता राखून समाजसेवेची भूमिका बजावावी तसेच संघटनात्मक एकजूट कायम ठेवावी, असे आवाहन जिल्हाध्यक्ष आनंदे यांनी केले. कार्यक्रमास संघटनेचे पदाधिकारी व तालुक्यातील अनेक केमिस्ट बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## महाडीबीटीवरील प्रलंबित शिष्यवृत्ती अर्ज निकाली काढण्यासाठी ३१ मेपर्यंतची मुदत

आरंभ मराठी । धाराशिव

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांना विविध शिष्यवृत्ती योजनांचा लाभ महाडीबीटी ऑनलाईन प्रणालीद्वारे दिला जातो. राज्य शासनाच्या सुधारित धोरणानुसार आगामी शैक्षणिक वर्ष २०२६-२७ पासून महाडीबीटी प्रणालीचे व्हर्जन २.० कार्यान्वित करण्यात येणार असल्याने शैक्षणिक वर्ष २०१९-२० ते २०२५-२६ या कालावधीतील प्रलंबित अर्ज ३१ मेपूर्वी पूर्णतः निकाली काढण्याचे निर्देश शासनाने दिले आहेत. या पार्श्वभूमीवर जिल्ह्यात अनुसूचित जाती प्रवर्गातील एकूण ४०२ विद्यार्थ्यांचे अर्ज महाविद्यालय व विद्यार्थी स्तरावर प्रलंबित असल्याची माहिती समाज कल्याण विभागाने दिली आहे. महाडीबीटी प्रणालीद्वारे अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांना भारत सरकार शिष्यवृत्ती, शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्क प्रतिपूर्ती, राजर्षी शाहू महाराज गुणवत्ता शिष्यवृत्ती तसेच व्यावसायिक अभ्यासक्रमातील विद्यार्थ्यांना निर्वाह भत्ता आदी योजनांचा लाभ दिला जातो.समाज कल्याण विभागाकडून जिल्ह्यातील सर्व महाविद्यालयांच्या प्राचार्यांना वेळोवेळी पत्र,वृत्तपत्र जाहिराती तसेच व्हॉट्सअॅप समूहांच्या माध्यमातून सूचना देण्यात आल्या होत्या.मात्र,अद्यापही अनेक अर्ज प्रलंबित असल्याचे दिसून येत आहे.प्रलंबित अर्ज वेळेत निकाली न काढल्यास नवीन प्रणालीमध्ये तांत्रिक अडचणी निर्माण होण्याची शक्यता असून विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ शकते.त्यामुळे या कामाला “सर्वोच्च प्राथमिकता” देऊन विहित मुदतीत सर्व अर्ज निकाली काढण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.दरम्यान,विहित मुदतीत अर्ज निकाली न काढल्याने अनुसूचित जाती प्रवर्गातील एखादा विद्यार्थी शिष्यवृत्तीपासून वंचित राहिल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित महाविद्यालयाचे प्राचार्य आणि संबंधित विद्यार्थ्यावर राहणार असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.३१ मेपर्यंत सर्व प्रलंबित अर्ज निकाली काढण्याचे आवाहन समाज कल्याणचे सहायक आयुक्त सचिन कवले यांनी केले आहे.

# नवतापाच्या झळांनी अंगातून निघे घामधारा; रोहिणी आली अन् उष्णतेचा कहर वाढला

## उष्णतेच्या तीव्र लाटेमुळे जनजीवन विस्कळीत; शेतकरी, मजूर आणि जनावरांनाही फटका

हर्षवर्धन मडके । आरंभ मराठी

**मोहा – मे महिन्याच्या अखेरीस सुरू झालेल्या 'नवतापा'मुळे राज्यासह ग्रामीण भागात उष्णतेची तीव्र लाट निर्माण झाली असून नागरिकांचा जीव अक्षरशः कासावीस झाला आहे. यंदा २५ मेपासून सुरू झालेला नवतापा २ जूनपर्यंत कायम राहण्याचा अंदाज हवामान विभागाने व्यक्त केला आहे. वाढत्या तापमानामुळे दुपारच्या वेळी गावातील रस्ते, चौक आणि बाजारपेठा ओस पडत असून शेतकरी, मजूर, ज्येष्ठ नागरिक आणि लहान मुलांचे हाल होत आहेत. या काळात लहान मुलांसह वयोवृद्धांनी आरोग्याची विशेष काळजी घेण्याची गरज आहे**

पंचांगानुसार सूर्य रोहिणी नक्षत्रात प्रवेश करतो, त्या कालावधीला 'नवतापा' असे म्हटले जाते. 'नव' म्हणजे नऊ आणि 'तपा' म्हणजे उष्णता. या सलग नऊ दिवसांत सूर्यकिरणांचा प्रभाव अधिक तीव्र होत असल्याने तापमानात झपाट्याने वाढ होते. वातावरणातील आर्द्रता कमी होऊन उष्ण व कोरडे वारे वाहू लागतात. परिणामी उष्णतेच्या लाटा निर्माण होत असून उष्माघाताचा धोका वाढला आहे. यंदाच्या नवतापात अनेक भागांमध्ये तापमानाने उच्चांक गाठला आहे. महाराष्ट्रातील ब्रम्हपुरी येथे तापमान तब्बल ४७.६ अंश सेल्सिअसपर्यंत पोहोचल्याची नोंद झाली आहे. ग्रामीण भागात दुपारच्या वेळेत शेतामध्ये काम करणे कठीण झाले असून अनेक मजूर सकाळी लवकर किंवा सायंकाळनंतरच काम करण्यास प्राधान्य देत आहेत. प्रखर उन्हामुळे जमिनीतील ओलावा कमी होत असून पेरणीपूर्व मशागतीची कामे करणाऱ्या शेतकऱ्यांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. उष्णतेचा परिणाम जनावरांवरही जाणवत आहे. दिवसभर उकाडा असल्याने जनावरे सावलीचा आसरा घेत असून दूध उत्पादनात घट होत असल्याचे पशुपालक सांगत आहेत. अनेक ठिकाणी विहिरी आणि बोअरवेलचे पाणी कमी झाल्याने जनावरांच्या पाण्याचा प्रश्नही गंभीर बनत आहे. कुक्कुटपालन व्यवसायावरही उष्णतेचा परिणाम दिसून येत असून पाण्याच्या संभाव्य टंचाईमुळे ग्रामस्थांमध्ये चिंता वाढली आहे. दरम्यान, आरोग्य विभागाने नागरिकांना विशेष काळजी घेण्याचे आवाहन केले आहे. दुपारी ११ ते सायंकाळी ५ या वेळेत शक्यतो घराबाहेर पडू नये, भरपूर पाणी प्यावे, डोक्यावर टोपी किंवा कापड वापरावे तसेच हलके व सूती कपडे परिधान करावेत, असा सल्ला देण्यात आला आहे. लिंबूपाणी, ताक, नारळपाणी आणि फळांचे रस यांसारखे द्रवपदार्थ घेण्याचेही आवाहन करण्यात आले आहे. गेल्या काही वर्षांत हवामान बदलामुळे तापमानात सातत्याने वाढ होत असल्याचे तज्ज्ञ सांगत आहेत. वाढते प्रदूषण, झपाट्याने होणारी वृक्षतोड आणि काँक्रीटच्या वाढत्या जंगलामुळे उष्णतेची तीव्रता अधिक वाढत असल्याचे निरीक्षण नोंदवले जात आहे. त्यामुळे ग्रामीण भागातही आता शहरांप्रमाणे उष्णतेचे चटके अधिक जाणवू लागले आहेत.



### नवतापा म्हणजे काय ?

'नव' म्हणजे नऊ आणि 'तपा' म्हणजे उष्णता. सूर्य रोहिणी नक्षत्रात प्रवेश केल्यानंतर सलग नऊ दिवस पृथ्वीवरील उष्णता मोठ्या प्रमाणात वाढते. या काळालाच 'नवतापा' असे म्हटले जाते. भारतीय पंचांग आणि पारंपरिक हवामानशास्त्रात या कालावधीला विशेष महत्त्व आहे. ग्रामीण भागात नवतापाला पावसाळ्याच्या आगमनाची चाहूल मानले जाते.

### उष्माघात टाळण्यासाठी ही काळजी घ्या

दुपारी ११ ते ५ दरम्यान घराबाहेर पडणे टाळा
भरपूर पाणी आणि द्रवपदार्थ घ्या
डोक्यावर टोपी, गमछा किंवा कापड वापरा
हलके व सूती कपडे परिधान करा
लहान मुले व वृद्धांची विशेष काळजी घ्या
उन्हातून आल्यावर त्वरित थंड पाणी पिऊ नये

### "नवतापा जितका कडक, तितका पाऊस चांगला"

ग्रामीण भागात नवतापाबाबत अनेक पारंपरिक समजुती प्रचलित आहेत. अनुभवी शेतकरी नवतापाच्या उष्णतेवरून आगामी पावसाचा अंदाज बांधतात. "नवतापा जितका कडक, तितका पाऊस चांगला" अशी म्हण आजही गावागावांत ऐकायला मिळते. या काळात जमिनीतील कीटक आणि जंतू नष्ट होऊन जमीन शेतीसाठी तयार होते, अशीही धारणा आहे.

# एमपीएससी पूर्व परीक्षेसाठी प्रशासन सज्ज

## परीक्षा केंद्रांभोवती कडक निर्बंध लागू

आरंभ मराठी । धाराशिव

महाराष्ट्र नागरी सेवा राजपत्रित गट-अ व गट-ब संयुक्त पूर्व परीक्षा २०२६ च्या पार्श्वभूमीवर जिल्हा प्रशासनाने कडक सुरक्षा व प्रतिबंधात्मक उपाययोजना लागू केल्या आहेत. परीक्षेची पारदर्शकता, शांतता व सुव्यवस्था कायम राहावी यासाठी भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ च्या कलम १६३ अंतर्गत परीक्षा केंद्र परिसरात विशेष आदेश जारी करण्यात आले आहेत. जिल्ह्यातील तब्बल १८७२ उमेदवार या परीक्षेला सामोरे जाणार आहेत. अपर जिल्हादंडाधिकारी यांनी जारी केलेल्या आदेशानुसार ३१ मे २०२६ रोजी सकाळी ७ ते सायंकाळी ७ या कालावधीत परीक्षा केंद्रांच्या १०० मीटर परिसरात विविध निर्बंध लागू राहणार आहेत. परीक्षा सकाळी १० ते दुपारी १२ आणि दुपारी ३ ते सायंकाळी ५ या दोन सत्रांत होणार आहे. जिल्ह्यातील श्रीपतराव भोसले हायस्कूल (पार्ट-अ व पार्ट-ब), अण्णा ई-टेक्नो इमारत, रामकृष्ण परमहंस महाविद्यालयाची नवीन व जुनी इमारत तसेच जिल्हा परिषद कन्या प्रशाला येथे परीक्षा केंद्र निश्चित करण्यात आले आहेत. प्रशासनाच्या आदेशानुसार परीक्षा केंद्र परिसरात घोषणाबाजी, गोंधळ, ध्वनीप्रदूषण अथवा शांततेस बाधा पोहोचवणाऱ्या कोणत्याही प्रकारच्या कृतींना बंदी घालण्यात आली आहे. तसेच झेरॉक्स सेंटर, पानटपऱ्या, टायपिंग सेंटर, एसटीडी बूथ, संगणक केंद्रे आणि इंटरनेट कॅफे बंद ठेवण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. परीक्षा केंद्र परिसरात मोबाईल फोन, सेल्युलर फोन, रेडिओ, इंटरनेट साधने, संगणक, कॅलक्युलेटर तसेच इतर इलेक्ट्रॉनिक उपकरणे घेऊन जाण्यास सक्त मनाई करण्यात आली आहे. कोणत्याही वाहनांना परीक्षा केंद्र परिसरात प्रवेश दिला जाणार नसून परीक्षेशी संबंध नसलेल्या व्यक्तींनाही प्रवेशबंदी करण्यात आली आहे. केवळ परीक्षा केंद्रावरील अधिकारी-कर्मचारी, शासकीय कर्मचारी, शिक्षक व परीक्षार्थींनाच प्रवेश दिला जाणार आहे. परीक्षार्थींच्या नातेवाईकांनाही केंद्र परिसरात थांबण्यास मनाई करण्यात आली आहे. याशिवाय परीक्षा केंद्रांच्या १०० मीटर परिसरात पाच किंवा त्यापेक्षा अधिक व्यक्तींना एकत्र जमण्यास बंदी घालण्यात आली आहे. आदेशाचे उल्लंघन करणाऱ्यांविरोधात भारतीय न्याय संहितेच्या कलम २२३ अन्वये गुन्हा दाखल करून फौजदारी कारवाई करण्यात येणार असल्याचा इशाराही प्रशासनाने दिला आहे.

# धाराशिवमध्ये उद्यापासून 32 वे नवोदित मराठी साहित्य संमेलन, तयारी पूर्ण

## संमेलनात ग्रंथदिंडी, परिसंवाद, ग्रंथप्रकाशन आणि पुरस्कारांचे होणार वितरण

आरंभ मराठी । धाराशिव



अखिल भारतीय मराठी साहित्य परिषद आयोजित 32 वे अखिल भारतीय नवोदित मराठी साहित्य संमेलन 29 व 30 मे 2026 रोजी धाराशिव शहरात उत्साहात पार पडणार असून देशभरातील सुमारे 900 साहित्यिक या संमेलनात सहभागी होणार आहेत. या साहित्य संमेलनाच्या कार्यक्रमांची माहिती देण्यासाठी साहित्य परिषदेचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. शरद गोरे यांनी मंगळवारी (दि.26) पत्रकार परिषद घेतली. साहित्य संमेलनाचे उद्घाटन 29 मे रोजी सकाळी 11 वाजता मान्यवरांच्या उपस्थितीत होणार आहे. उद्घाटन सोहळ्यास उपमुख्यमंत्री सुनेत्राताई अजित पवार, अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष व ज्येष्ठ साहित्यिक श्रीपाल सबनीस तसेच खासदार ओमराजे निंबाळकर उपस्थित राहणार आहेत. संमेलनाच्या मुख्य प्रवेशद्वाराला संत गोरोबा काका यांचे नाव देण्यात आले असून विचारपीठाला दिवंगत ग्रामीण साहित्यिक प्रा. भास्कर चंदनशिव यांचे नाव देण्यात आल्याची माहिती डॉ. गोरे यांनी दिली. संमेलनाच्या उद्घाटन दिनी 29 मे रोजी सकाळी 9 वाजता छत्रपती शिवाजी महाराज चौकातून भव्य ग्रंथदिंडी काढण्यात येणार आहे. ही ग्रंथदिंडी डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक, संत गाडगेबाबा चौक, छत्रपती संभाजी महाराज चौक, महात्मा जोतिबा फुले चौक तसेच लहुजी वस्ताद साळवे चौक येथे महापुरुषांना अभिवादन करत संमेलनस्थळी पोहोचणार आहे. उद्घाटन समारंभात सहा ग्रंथांचे प्रकाशन करण्यात येणार आहे. यामध्ये "महाराष्ट्राचे शिल्पकार लोकनेते अजित पवार" या 156 कवींनी आदरांजली वाहिलेल्या ग्रंथाचा समावेश आहे. तसेच तु. दा. गंगावणे लिखित "मराठवाडा मुक्ती संग्रामाचे झुंजार सेनानी", किशोर टिळेकर लिखित "राजकारण आणि पुढारी" आणि सूर्यकांत नांदगुडे लिखित "संत कबीरांचे दोहे मराठीत" या ग्रंथांचेही प्रकाशन होणार आहे.यावेळी दिवंगत लेखक भास्कर चंदनशिव यांना साहित्य जीवन गौरव पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. तसेच किशोर टिळेकर यांना साहित्यरत्न पुरस्कार, तर विनोद राऊत, दत्तात्रय भोंगळे आणि गणेश मोरे यांना पत्रकाररत्न पुरस्काराने गौरविण्यात येणार आहे. 29 मे रोजी दुपारच्या सत्रात जनार्दन वाघमारे यांच्या अध्यक्षतेखाली "महिलांवरील वाढत्या अत्याचाराला जबाबदार कोण ?" या विषयावर परिसंवाद आयोजित करण्यात आला आहे. या परिसंवादात खासदार प्रा. ज्योती वाघमारे सहभागी होणार आहेत. त्यानंतर दुपारी 4 वाजता "प्रसार माध्यमं किती तारक किती मारक ?" या विषयावर परिसंवाद होणार असून त्यात विनोद राऊत सहभागी राहतील. 30 मे रोजी "बोली भाषेची गळचेपी होते का ?" या विषयावर विशेष परिसंवाद आयोजित करण्यात आला आहे. यामध्ये भाषातज्ञ प्रा. मिलिंद रणगाणे, डॉ. शैला जगदंबे आणि प्रा. राजा राऊत सहभागी होणार आहेत. मराठी भाषेसंदर्भात घेतलेल्या भूमिकेबद्दल परिवहन मंत्री व धाराशिव जिल्ह्याचे पालकमंत्री प्रताप सरनाईक यांचा या साहित्य संमेलनात विशेष सन्मान करण्यात येणार आहे. या साहित्य संमेलनाला धाराशिवकरांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून साहित्याच्या मेजवानीचा आनंद घ्यावा, असे आवाहन साहित्य परिषदेचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. शरद गोरे आणि राष्ट्रीय विश्वस्त ज्ञानेश्वर पतंगे यांनी केले. यावेळी मराठवाडा अध्यक्ष परमेश्वर पालकर आणि प्रा. राजा जगताप उपस्थित होते.

# कृषी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांची तेर येथे ग्रामभेट



आरंभ मराठी । तेर

धाराशिव तालुक्यातील आळणी (गडपाटी) येथील कृषी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांच्या वतीने तेर येथे 'RAWE' (Rural Agricultural Work Experience) कार्यक्रमांतर्गत ग्रामभेट दौरा व परिचय बैठक उत्साहात पार पडली. मंगळवारी (दि.२६) बी.एस्सी. ॲग्रीकल्चर अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांकडून राबविण्यात येणाऱ्या 'RAWE' कार्यक्रमाच्या अनुषंगाने ही भेट आयोजित करण्यात आली होती. यावेळी विद्यार्थ्यांनी ग्रामस्थांची भेट घेऊन कार्यक्रमाची सविस्तर माहिती दिली. तसेच ग्रामीण कृषी विकासामध्ये विद्यार्थ्यांची भूमिका, शेतकऱ्यांसाठी उपयुक्त उपक्रम आणि आगामी काळात राबविण्यात येणाऱ्या विविध कृषीविषयक उपक्रमांबाबत चर्चा करण्यात आली. ग्रामपंचायत प्रशासनाच्या वतीने विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यात आले असून या उपक्रमासाठी पूर्ण सहकार्य करण्याची भूमिका व्यक्त करण्यात आली. यावेळी ग्रामपंचायत सदस्य बापू नाईकवाडी यांच्यासह समीर बनसोडे, फैसल काझी आदी उपस्थित होते. तसेच समर्थ पाटील, शिवम शेळके, आनंद वीर, ज्ञानसागर पवार, स्वप्निल पासले, रोहित पाटील, हर्ष वाघ, योगेश सवने आदी विद्यार्थ्यांनी कृषी विषयक मार्गदर्शन करून विविध माहिती ग्रामस्थांना दिली.

# माथाडी कामगारांच्या आंदोलनाला डॉ. प्रतापसिंह पाटील यांचा जाहीर पाठिंबा

आरंभ मराठी । धाराशिव

माथाडी कामगारांच्या विविध प्रलंबित मागण्या व न्याय्य हक्कांसाठी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर सुरू असलेल्या आंदोलनाला राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार) चे जिल्हाध्यक्ष डॉ. प्रतापसिंह पाटील यांनी भेट देत आंदोलक कामगारांशी संवाद साधला. यावेळी त्यांनी कामगारांच्या मागण्यांना जाहीर पाठिंबा देत त्यांच्या हक्कांसाठीच्या प्रत्येक लढ्यात कायम सोबत राहण्याची ग्वाही दिली. आंदोलनस्थळी उपस्थित माथाडी कामगारांच्या समस्या, अडचणी आणि विविध मागण्यांविषयी डॉ. पाटील यांनी सविस्तर माहिती घेतली. कामगारांना न्याय मिळावा आणि त्यांच्या हक्कांचे संरक्षण व्हावे, यासाठी शासन व प्रशासनाने सकारात्मक भूमिका घ्यावी, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. यावेळी बोलताना डॉ. प्रतापसिंह पाटील म्हणाले की, माथाडी कामगार हे समाजातील कष्टकरी घटक असून त्यांच्या न्याय्य हक्कांसाठीचा संघर्ष महत्त्वाचा आहे. कामगारांच्या प्रश्नांबाबत प्रशासनाने तातडीने निर्णय घेऊन त्यांच्या मागण्यांचा गांभीर्याने विचार करावा. या भेटीदरम्यान



नगरसेवक सुनील आंबेकर, नगरसेवक पंकज भोसले, नगरसेवक सर्फराज कुरेशी, नगरसेवक अशोक देवकते, युवक प्रदेश सरचिटणीस इंजिनिअर रामेश्वर पवार, जिल्हा संघटक अमोल सुरवसे, शहर कार्याध्यक्ष नरसिंह मिटकरी, ॲड. योगेश सोन्नेपाटील, शुभम सुकाळे यांच्यासह इतर पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# ज्ञानोद्योग विद्यालयाच्या 1968-69 च्या माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा उत्साहात



आरंभ मराठी । येरमाळा

ज्ञानोद्योग विद्यालय, येरमाळा येथील १९६८-६९ च्या इयत्ता दहावीच्या माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा मोठ्या उत्साहात आणि भावनिक वातावरणात संपन्न झाला. अनेक दशकांनंतर एकत्र आलेल्या विद्यार्थ्यांनी जुन्या आठवणींना उजाळा देत मैत्रीचे बंध पुन्हा दृढ केले. सोमवारी (दि.२५) सकाळी १० वाजता श्री विठ्ठल-रुख्माई मंदिर येथे या स्नेहमेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमास आबासाहेब बारकुल (उपाध्यक्ष, ज्ञान प्रसारक मंडळ येरमाळा), विकास बारकुल (माजी सभापती, पंचायत समिती कळंब), वृशाली राहुल पाटील (सदस्य, पंचायत समिती कळंब), भाऊसाहेब बारकुल (अध्यक्ष, शालेय समिती), सुभाष पाटील (सदस्य, शालेय समिती), सुनिल पाटील (प्राचार्य, ज्ञानोद्योग माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, येरमाळा) तसेच डॉ. संदीप तांबारे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी सन १९६८-६९ च्या विद्यार्थ्यांना शिक्षण देणाऱ्या गुरुजनांचा योगज्ञानाप्रित्यर्थ सन्मान करण्यात आला. या प्रसंगी उपस्थित विद्यार्थ्यांनी शालेय जीवनातील आठवणी, अनुभव आणि जुन्या मैत्रीच्या आठवणींना उजाळा दिला. दीर्घ कालावधीनंतर एकत्र आल्याने सर्वांमध्ये विशेष आनंदाचे वातावरण निर्माण झाले होते. या स्नेहमेळाव्याच्या यशस्वी आयोजनासाठी अशोक मोहेकर, दत्तात्रय बारकुल आणि शेषराव कुलकर्णी यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमास माजी विद्यार्थी, ग्रामस्थ आणि विविध क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.